# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या एकोणपन्नासाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि.२५ मार्च, २०१३ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची एकोणपन्नासावी सभा सोमवार, दि.२५ मार्च, २०१३ रोजी दुपारी १:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सूर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ७) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| १०) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १२) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १३) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १४) | डॉ. पुजारी डी. डी. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १५) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

डॉ. पाटील टी. आर. व डॉ. एस. डी. कदम यांनी दूरध्वनीद्वारे तसेच सौ. मोहिते-पाटील पी. पी. यांनी पत्राद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.०४ मार्च, २०१३ रोजीच्या अठ्ठेचाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.०४ मार्च, २०१३ रोजीच्या अठ्ठेचाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून खालील दुरुस्तीसह कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**१. पान क्र. ११ वरील ठराव क्र. १० मधील चौथ्या ओळीमधील "वेतनातून" हा शब्द वगळण्यात यावा.**

**[ ०२ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव :** **मा.कुलगुरु यांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्या संदर्भात महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ या अधिकार मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी : मा.सचिव, प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

प्रज्ञा एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर हे महाविद्यालय शै.वर्ष २००८-०९ पासून दि आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या नावाने सुरु झाले आहे. उपरोक्त संस्थेने शै.वर्ष २००९ मध्ये महाविद्यालयाच्या नावात नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर असा बदल प्रस्तुत विद्यापीठ व संबंधित प्राधिकरणांच्या मान्यतेअंती केलेला आहे.

मा.सचिव, प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, सोलापूर यांनी संचलित महाविद्यालयात एम.बी.ए हा अभ्यासक्रम सुरु असल्याने महाविद्यालयाच्या नावात **नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या ऐवजी नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, सोलापूर असा** बदल करण्यासाठी संस्थेने पुन:श्च विहीत नमुन्यात आवश्यक शुल्कासह प्रस्ताव सादर केला आहे. याप्रमाणे नावातील बदलास ए.आय.सी.टी.ई,नवी दिल्ली यांची मान्यता घेण्यास पुढील कार्यवाही करण्यास्तव त्यांचे नियमावलीनुसार विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास संबंधित संस्थेस ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची बाब प्रथम महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ सभेसमोर सादर करुन त्यांची शिफारस घेणे व सदर शिफारसीसह महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याची बाब व्यवस्थापन परिषद सभेसमोर सादर करुन व्यवस्थापन परिषदेची ना-हरकत प्रमाणपत्र संबंधित संस्थेस निर्गमित करण्यास मान्यता घेणे आवश्यक आहे. व तद्नंतर सदर संस्थेस संचलित महाविद्यालयाच्या नावातील बदलास शिखर संस्थेची व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास मान्यता देता येईल.

सदरकामी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर संस्थेस संचलित महाविद्यालयाच्या

नावातील बदला संदर्भात कार्यवाही करण्यास्तव शिखर संस्थेकडे सादर करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

त्यास्तव प्रज्ञा एज्युकेशन सोसायटी संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात खालील प्रमाणे बदल करण्या संदर्भात उपरोक्त संस्थेस प्रस्तुत विद्यापीठाचे ए.आय.सी.टी.ई नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची बाब दि.०८.०३.२०१३ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समिती सभेमसमोर सादर केला असता सदर समितीने ठराव क्रं २ अन्वये खालील प्रमाणे महाविद्यालयाच्या नावात बदल स्विकारुन ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांचेकडे सदरबाबत कार्यवाही करण्यासाठी संबंधित संस्थेस ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची शिफारस महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

| महाविद्यालयाचे सद्य:स्थितील नाव | महाविद्यालयाच्या नावातील बदल |
|---|---|
| प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर | **प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, सोलापूर** |

प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्या संदर्भात महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ या अधिकार मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव :** **प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्या संदर्भात महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन महाराष्ट्र शासनास व ए. आय. सी. टी. ई. या शिखर संस्थेकडे शिफारस करण्यात आली.**

**[ ०४ ] डॉ. गो. मा. पवार, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी दिलेला ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः डॉ. गो. मा. पवार, सेवानिवृत्त प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी त्यांच्या व्यक्तिगट ग्रंथ संग्रहातील ग्रंथ विद्यापीठ ग्रंथालयास देणगी दाखल स्विकारण्याबाबत दि.०६/०३/२०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच सदरचे शोधनिबंध संग्रह विद्यापीठ विभागाकडील संबंधित विषयाच्या विद्यार्थी / विद्यार्थीनी यांना अभ्यासक्रमासाठी उपयुक्त होणार आहेत.

तरी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (h) मध्ये पुढील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. (h) accept, on behalf of the university, trusts, bequests, donations and transfer of any movable or immovable property to the university.

उक्त तरतुदीनुसार शोधनिबंध संग्रह विद्यापीठाकडील संबंधित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त सदरचे ग्रंथ विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : डॉ. गो. मा. पवार, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी दिलेला ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] श्रीमती शैलजा अशोक डांगे, राघवेंद्र नगर, सोलापूर यांनी दिलेला ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: श्रीमती शैलजा अशोक डांगे, राघवेंद्र नगर, सोलापूर यांनी त्यांच्या व्यक्तिगत ग्रंथ संग्रहातील ग्रंथ विद्यापीठ ग्रंथालयास देणगी दाखल स्विकारण्याबाबत दि.०७/०३/२०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच सदरचे ग्रंथसंग्रह विद्यापीठ विभागाकडील संबंधित विषयाच्या विद्यार्थी / विद्यार्थींनी यांना अभ्यासक्रमासाठी उपयुक्त होणार आहेत.

तरी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ कलम २८ (h) मध्ये पुढील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. (h) accept, on behalf of the university, trusts, bequests, donations and transfer of any movable or immovable property to the university.

उक्त तरतुदीनुसार ग्रंथसंग्रह विद्यापीठाकडील संबंधित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त होणारे सदरचे ग्रंथ विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : श्रीमती शैलजा अशोक डांगे, राघवेंद्र नगर, सोलापूर यांनी दिलेला ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] विद्यापीठाने दाखल केलेले Letters Patent Appeal No.५१/२०११ In Writ Pettiion No. ९६७५/२०१० मध्ये दाखल करावयाचे Consent Terms मे. कोर्टात सादर करण्यासाठीची बाब विचारार्थ.**

(टिपणी: दि.२८/०१/२०१३ रोजी श्री. हरीश भालचंद्र गारमपल्ली (बडतर्फ वाहनचालक, खुला प्रवर्ग) यांनी विद्यापीठास अर्ज सादर करुन सेवा सलग धरुन पूर्वलक्षीप्रभावाने कायम करुन त्याप्रमाणे पगार निश्चित करुन मी मधल्या काळातील (Back Wages) पगाराचा हक्क सोडून देण्यास तयार आहे व तसे मे. मुंबई उच्च न्यायालयातही तडजोड करण्यास तयार असल्याबाबतचे नमूद करुन विनंती अर्ज सादर केलेला होता.

सदर अर्जाच्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/०२/२०१३ रोजीच्या बैठकीत विषय क्र.१५ द्वारे याबाबत तडजोड करणेकामी,

**"मा. उच्च न्यायालयासमोर तडजोड करुन आदेश घेण्यात यावेत ",**

असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

विद्यापीठाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मा. पीठासन अधिकारी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्या आदेशाविरुध्द दाखल केलेले Letters Patent Appeal No.५१/२०११ In Writ Pettiion No. ९६७५/२०१० मध्ये दाखल करावयाचे Consent Terms प्राप्त झालेले आहे.

सदरचे Consent Terms हे व्यवस्थापन परिषदच्या मान्यतेने मे. कोर्टात सादर करण्यासाठीची बाब विचारार्थ).

ठराव : **विद्यापीठाने दाखल केलेले Letters Patent Appeal No.५१/२०११ In Writ Pettiion No. ९६७५/२०१० मध्ये दाखल करावयाचे Consent Terms खालील दुरुस्तीसह मे. कोर्टात सादर करण्यास मान्यता देण्यात आली.**

**१) पान क्र. १ वरील पहिल्या परिच्छेदामध्ये, settled नंतर "in the following terms" या शब्दांचा समावेश करण्यात यावा.**

**२) पान क्र. १ वरील अ.क्र. १. खालीलप्रमाणे दुरुस्त करण्यास मान्यता देण्यात आली.**
**That by consent, the R no-1 Shri Harish Bhalchandra Garampalli, waives his right over the monetary claims, from the date of termination 4-11-2009, till the date he resumes his services again, as is provided by the judgement and order dt:16-9-2010, passed by the Ld College Tribunal in Appeal no:8 of 2010, and the rest of the part of the said judgement and order is retained and is to be acted upon by the present Appellant.**

**३) पान क्र. २ वरील अ.क्र. ४. खालीलप्रमाणे दुरुस्त करण्यास मान्यता देण्यात आली.**
**That the above consent terms are to be given effect within two weeks from the date of orders passed in the above consent terms by this Hon'ble Court. The necessary proposal will be submitted by appellant to the office of Learned Joint Director, Higher Education, Solapur Region, Solapur who in turn will consider and take appropriate action thereafter.**

**[ ०७ ] शै.वर्ष २०१३-१४ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारसी करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: शै.वर्ष २०१३-१४ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे ए. आय. सी. टी. ई अंतर्गत अभ्यासक्रमाच्या व पारंपारिक अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (४) अन्वये प्रथम महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या शिफारसीकरीता सादर करुन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारसीसह व्यवस्थापन परिषदेसमोर शिफारसीस्तव सादर करणे आवश्यक आहे. व तदन्ंतर व्यवस्थापन परिषदेच्या शिफारसीनंतर प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठ स्तरावरुन विहीत प्रक्रिया होवून प्रस्ताव संबंधित प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीस्तव विहीत मुदतीत शिखर संस्था व महाराष्ट्र शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन दि.०८/०३/२०१३ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ सभेसमोर संलग्नित महाविद्यालयांकडून शै.वर्ष २०१३-१४ करीता नैसर्गिक विस्तारांसाठी प्राप्त प्रस्तावांना शिफारस करण्याची बाब सादर केली असता ठराव क्रं ४ अन्वये महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने सोबतच्या तक्ता ‘ब’ मधील महाविद्यालयाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

सबब शै.वर्ष २०१३-१४ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारसी करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : शै.वर्ष २०१३-१४ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांबाबत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन खालील दुरुस्तीसह शासनास शिफारस करण्यात आली.**

**१) जोडपत्रातील पान क्र. ६ वरील अ.क्र. ६ मध्ये "१२०" ऐवजी "शिफारस आहे" अशी दुरुस्ती करण्यात यावी.**

**[ ०८ ] शै.वर्ष २०१३-१४ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि.३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४ दि.२५/१०/२०११ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म. वि. कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव.**

(टिपणी: शै.वर्ष २०१३-१४ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे नोंदणीकृत संस्थाकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदर प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि.३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४ दि.२५.१०.२०११ नुसार कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन शै.वर्ष २०१३-१४ पासून नोंदणीकृत संस्थेकडून व संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक अभ्यासक्रमातंर्गत येणा-या नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मा.कुलगुरु महोदय यांनी सोबत जोडल्या प्रमाणे केलेली कार्यवाही दि.०८/०३/२०१३ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेसमारे विषय क्रं ५ अन्वये माहितीस्तव सादर करण्यात आली असता, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने ठराव क्रं ५ अन्वये उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आलेली आहे.

सबब शै.वर्ष २०१३-१४ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३/१०) मशि ४ दि.३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११/(२४० / ११) मशि ४ दि.२५.१०.२०११ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव).

**ठराव :** **अ) मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**ब) शै.वर्ष २०१३-१४ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठीची महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची शिफारस स्विकारुन प्राप्त प्रस्तावाची शासनास शिफारस करण्यात आली.**

**[ ०९ ]** **शै.वर्ष २०१३-१४ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई, अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या नविन विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४ दि.२५/१०/२०११ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार सदरचे प्रस्ताव संबंधित शिखर संस्था व शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव.**

(टिपणी: शै.वर्ष २०१३-१४ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे संलग्नित महाविद्यालयांकडून ए. आय. सी. टी. ई अभ्यासक्रमातंर्गत येणा-या नवीन विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदर प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१०/(१९३/१०)/मशि ४ दि.३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११/(२४०/११) मशि ४ दि.२५/१०/२०११ नुसार कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन शै.वर्ष २०१३-१४ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई अभ्यासक्रमातंर्गत येणा-या नवीन विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मा.कुलगुरु महोदय यांनी सोबत जोडल्या प्रमाणे केलेली कार्यवाही दि.०८/०३/२०१३ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेसमारे विषय क्रं ६ अन्वये माहितीस्तव सादर करण्यात आली असता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने ठराव क्रं ६ अन्वये उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली आहे.

सबब शै.वर्ष २०१३-१४ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून ए. आय. सी. टी. ई अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या नविन विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्रं एनजीसी २०१०/(१९३/१०)/मशि ४ दि..३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११/(२४०/११)/मशि ४ दि.२५.१०.२०११ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार सदरचे प्रस्ताव संबंधित शिखर संस्था व शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव).

**ठराव :** **अ) मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**ब) शै.वर्ष २०१३-१४ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई, अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या नविन विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता व विद्याशाखा सुरु करण्यासाठीची महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची शिफारस स्विकारुन प्राप्त प्रस्तावाची शासनास शिफारस करण्यात आली.**

**[ १० ] विद्यापीठ ग्रंथालय विभागात J-Gate e-Journal Database सुविधा सुरु करणेबाबत.**

(टिपणी: विद्यापीठाच्या ग्रंथालय विभागात e-Journal Database सुविधा सुरु करण्यासाठी विविध विद्यापीठ / शैक्षणिक संस्था यांचेकडे दुरध्वनीवरुन चौकशी केली असता, त्यांनी Informatics (India) LTD., Bangalore यांची J-Gate e-Journal Database ही सुविधा वापरत असल्याबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने सदर कंपनीकडे चौकशी केली असता त्यांनी दि.२७/१०/२०१२ च्या ई-मेलद्वारे Databse, Modules, Annual Subscription rate, Clientlist, Features and Benefits इ. माहिती कळविली असून सोबत जोडली आहे. यामधील Clientlist नुसार पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ, भारती विद्यापीठ इ. नामांकीत संस्था सदर कंपनीचे ग्राहक असल्याचे दिसून येते.

सर्व संबंधित संकुलाचे संचालक यांचेकडे J-Gate Database सुविधा घेणेबाबत अभिप्राय मागितला असता, सर्व संचालकांनी सदर कंपनीची Database सुविधा आमच्या संकुलास उपलब्ध करुन द्यावी असा अभिप्राय दिला आहे.

Informatics (India) LTD., Bangalore या कंपनीचे J-Gate e-Journal Database हे Proprietary Product असून त्याद्वारे अंदाजे १०,००० पेक्षा जास्त प्रकाशन व ३०,००० पेक्षा जास्त विविध विषयावरील e-Journals वाचकांस उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे ग्रंथालय विभागामार्फत सर्व संकुले / विद्यार्थी / वाचक यांना e-resources facility मिळणार आहे. तसेच विद्यापीठातील M.B.A विभागाच्या AICTE मान्यतेसाठी J-Gate e-Journal Database सुविधा असणे गरजेचे आहे असे त्या विभागाच्या मा. संचालक यांनी कळविले आहे.

J-Gate e-Journal Database ही सुविधा विद्यापीठाकरिता उपलब्ध होण्यासाठी रु.२,००,२४९/- अधिक टॅक्स इतकी वार्षिक वर्गणी भरावी लागणार असून तसा Invioce Proforma कंपनीने ई-मेलद्वारे पाठविला आहे. यासाठी होणारा खर्च संबंधित संकुलाच्या संचालकांनी केलेल्या शिफारशीनुसार ग्रंथालय विभागाच्या Books and Journal या उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूदीखाली असणाऱ्या विविध सात संकुलाखाली समप्रमाणात खर्ची टाकण्यास व सदरची बाब ही सेवा असल्यामुळे व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र.२१ दि.२१/०७/२०११ अन्वये उपरोक्त विषय व्यवस्थापन परिषदेसमोर बाब विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठ ग्रंथालय विभागात J-Gate e-Journal Database सुविधा सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.**

## व्यवस्थापन परिषदेसाठी आयत्या वेळेचा विषय

**[११ (१)] AVISHKAR- Solapur University Research Journal (Vol. 2, 2012) छपाई करुन घेण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१ जुलै २००८ रोजीच्या मा. कुलपती महोदय कार्यालय बैठकीत, यजमान विद्यापीठाने आविष्कार महोत्सवासाठी जमा झालेल्या रक्कमेपैकी प्रती विद्यार्थी रु.२/- प्रमाणे Corpus Fund निर्माण करुन सदर रक्कमेच्या येणाऱ्या व्याजातून कायमस्वरुपी नियतकालिक (Journal) प्रत्येक शै.वर्षात प्रसिध्द करण्यात यावे, असे ठरले आहे. सबब कायमस्वरुपी ठेव रु.३०,३१,६९७/- व त्यावरील व्याज अंदाजे रु.२,१०,०००/- प्रतीवर्षास आहे. यातून गतवर्षी AVISHKAR- Solapur University Research Journal (Vol. 1, 2011) प्रकाशित केलेले आहे.

यास्तव AVISHKAR- Solapur University Research Journal (Vol. 2, 2012) छपाई करुन घेण्यासाठी मान्यवर छपाईदारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यासाठी दैनिक तरुणभारत या वर्तमानपत्रामध्ये दिनांक २५/०२/२०१३ रोजी जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा स्विकारण्याची मुदत दि.५/३/२०१३ दुपारी १:०० वाजेपर्यंत होती. नियमाप्रमाणे तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे, तथापि दोन निविदा विहीत वेळेत प्राप्त होत्या. यास्तव, दैनिक दिव्य मराठी या वर्तमानपत्रामध्ये दिनांक १२/०३/२०१३ रोजी निविदेस मुदत वाढ बाबत जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१८/३/२०१३ रोजी दुपारी १:०० वाजेपर्यंत होती. सदर मुदतीत एकूण ४ फर्मचे व पूर्वी मुदतीत आलेले २ निविदा असे एकूण ६ फर्मचे निविदा प्राप्त झालेले असून, ते दिनांक १८/३/२०१३ रोजी दुपारी ३:०० वाजता छपाईदारांसमोर व निविदा समितीसमोर उघडण्यात आलेले आहेत. त्याचा तौलनिक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार मे. लोकमंगल प्रिंट ॲन्ड पॅक लि., सोलापूर याचे न्यूनतम दर रु.३१.७०/- (अक्षरी ऐकतीस रुपये सत्तर पैसे फक्त) प्रती पुस्तक अंदाजे १०० पाने पाठपोठ (म्हणजे २०० छपाईची पाने) व पाने वाढल्यास प्रती पान रु.२,२७८.४२/- (५००० प्रतीसाठी) असल्याने, त्यांना आविष्कार नियतकालीक छपाई पुरवठा आदेश देण्याची शिफारस समितीने केली आहे.

नियतकालीक छपाई ही खरेदी नसून सेवा आहे. याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दि.२१ जुलै २०११ रोजीच्या विषय क्रं.२१ वरील ठरावानुसार, लोकमंगल पिंट ॲन्ड पॅक लि., सोलापूर यांचेकडून रु.३१.७०/- प्रती पुस्तक प्रमाणे AVISHKAR- Solapur University Research Journal (Vol. 2, 2012) नियतकालीकेच्या ५००० प्रती छपाई करुन घेण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **मे. लोकमंगल प्रिंट ॲन्ड पॅक, सोलापूर यांच्याकडून रु.३१.७०/- प्रति पुस्तक अंदाजे १०० पाने पाठपोठ (म्हणजे २०० छपाईची पाने) व पाने वाढल्यास प्रति पान रु.२,२७८.४२/- (५००० प्रतीसाठी) याप्रमाणे AVISHKAR- Solapur University Research Journal (Vol. 2, 2012) छपाई करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |